स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
विष्णुपूरी, नांदेड - 431 606 (महाराष्ट्र)

इतिहास विभाग मानव्यविद्या संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड अंतर्गत पी.एचडी. (इतिहास) पदवीसाठी सादर करावयाच्या

शोध प्रबंधाची रुपरेखा

''नांदेड परिसरातील वीर, वीरगळ व सतीशिळा - एक ऐतिहासिक अभ्यास''.

संशोधक

काळे दिपक सोनाजीराव

एम.ए.एम.फील.पी.जी.डिप्लोमा इन म्युजीऑलॉजी

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ.सुर्यवंशी नारायण बाबुराव

(एम.ए.एम.फील पी.एच.डी.)

इतिहास विभाग प्रमुख

शिवनेरी महाविद्यालय शिरुर अनंतपाळ, जि.लातूर

सन. 2017

नांदेड परिसरातील वीर, वीरगळ व सतीशिळा - एक ऐतिहासीक अभ्यास.

प्रस्तावना : (Introduction)

शोध हा पुरातत्वाचा आत्मा आहे. त्याकरीता संशोधकाला सांस्कृतिक सभ्यता अभ्यासणे गरजेचे आहे. प्राचीन मानवी संस्कृतींचा जन्म जगात नदयांच्या काठी झालेला आहे. तद्वतच माझे संशोधन क्षेत्र हे प्राचीन समृध्द अशा गोदावरी खो-यामध्ये आहे. तिच्या कुशीतच मराठवाडा विसावलेला आहे. महाराष्ट्रामध्ये मराठवाडा हा भौगोलिक दृष्टया आणि ऐतीहासीक दृष्ट्या इतर विभागापेक्षा अधिक संपन्न आहे.

मराठवाडा विभाग औरंगाबाद,बीड,उसमानाबाद,जालना,लातूर,हिंगोली,परभणी आणि नांदेड या आठ जिल्हयामध्ये विभागलेला असून, भारताच्या विस्तीर्ण अशा दक्षिण पठराचा प्रमुख भाग आहे. 70^0 5’ ते 78^0 5’ पूर्व रेखांश आणि 17^0 5’ ते 20^0 5’ उत्तर अक्षांश एवढी त्याची भौगोलिक व्याप्ती आहे. एकूण 65789 चौ.कि.मी. एवढे त्याचे क्षेत्रफळ असून, विदर्भ, तेलंगाना,कनार्टक आणि पश्चिम महाराष्ट्राने तो वेढलेला आहे. समुद्र सपाटीपासून उंची साधारण 300 ते 650 मीटर इतकी आहे.

संपूर्ण दक्षिण पठार प्राचिन अग्निजन्य खडकाने बनलेले असून हे खडक जगातील अति प्राचीन अशा गोंडवन भूखंडाचे अवशेष आहेत. प्राचिन काळी या भागास दंडकारण्य म्हणत असल्याचे पुरावे प्राचीन साहित्यात आढळतात. गोदावरी खो-याचा मराठवाडयातील अक्षवृतीय विस्तार 18^0 40’ उत्तर ते 20^0 40’ उत्तर इतका आहे. नांदेड जिल्हयात गोदावरी नदीचा प्रवेश पश्चिमेकडून होतो व जिल्हयाच्या मध्यभागातून ती वाहते. नांदेड जिल्हयात 110 कि.मी. लांबीचा गोदावरी नदीचा प्रवाह आहे.

प्रादेशिक संस्कृती म्हणजे एका विशिष्ट प्रदेशात राहणा-या जनसमुहाची वातावरण विषयक सामुदायाची प्रतिक्रिया होय. त्यामूळे नांदेड जिल्हयातील गोदा खो-याचा अभ्यास करतेवेळी उपनदयांवरील पुरातत्वीय व ऐतिहासिक स्थळे शोधने गरजेचे आहे.

नांदेड जिल्हयामध्ये परिसराचा प्रादेशिक विशेषतेचा विचार करतेवेळी दक्षिण पथाच्या तसेच शेजारील कनार्टक व तेलंगाना, आंध्रप्रदेशाच्या प्रादेशिक विशेषतेचा विचार करावा लागतो.

सहयाद्रीच्या असंख्य लहानमोठया रांगा हे दक्षिणापथाचे खास वैशिष्टये होय. त्याच बरोबर गोदावरीच्या खो-यामध्ये नांदेड उर्फ नंदितट व नवनंदडेरा हे प्राचीन नगर वसले आहे. आश्मयुगात मानव जी हत्यारे वापरत होता, त्याचे पुरावे नांदेड परीसरात भोकर,किनवट, देगलूर येथे मिळालेली आहेत. तसेच ताम्रपाषाणयुगिन स्थळे, अश्मक व मुलक जनपद हे ही मराठवाडयासी सबंधीत आहेत. अश्मक जनपदाची नाणी नांदेड परिसरात मिळाली आहेत. अश्मकाची राजधानी बोधन येथे होती. नंद राजाचा नंदगिरी किल्ला नांदेड येथे आहे. त्यानंतर सातवाहन काळात नांदेड ही बाजार पेठ होती. वाकाटक, पुर्व चालूक्य, राष्ट्रकुट, कल्याणी चालुक्य, अशा राजवटींचे शिलालेख व समृध्द अवशेष या परिसरात आढळतात.

मराठवाडयाच्या भागात कल्याणी चालूक्यांची सत्ता बराच काळ होती. ठिकठिकाणी कला कौशल्यपुर्ण पण जिर्ण अवस्थेत असलेली मंदीरे, शिल्पावशेष हि चालूक्य काळांची निश्चित ग्वाही देतात. या खेरीज शिलालेखाचे पुरावे काही कमी नाहीत. कानडी व देवनागरी अशा दोन्ही लिपीतील शिलालेखांचा या कामी उपयोग होवू शकतो. शक सवंत 1056 च्या एका नागरी शिलालेखाच्या प्रारंभीच “चालुक्य वंसो नृपपुंगवानाम्” असा उल्लेख आढळतो.

राष्ट्रकुटांनी चालुक्यांचा पराभव करुन मराठवाडयाच्या प्रदेशावर आपला आमंल बसविला. यासाठी पइठ्ठान समीप असलेल्या खईरोंण्डी गावाचे दानपत्र राष्ट्रकुट राजा करुन देवू शकला आहे. राष्ट्रकुटांचे असे ताम्रपट या भागात कमी नाहीत. पट्टबंधोत्सवानिमित्त तो कुरुंदा गावी आलेला आहे. धारुर सारख्या ठिकांणी ही “विषय” म्हणून त्यांचा राजकिय आमंल चालू होता. म्हणजे संपूर्ण मराठवाडयावर सातवाहन, कल्याणी चालूक्य आणि नंतर राष्ट्रकुट यांचे राज्य होते. तसेच यादवकालीन शिलालेख, मंदीरे, व बारवा आणि शिल्पवैभव मराठवाडयात आढळतात.

महाराष्ट्र राज्याच्या आग्नेय दिशेला मराठवाडा विभागात नांदेड हा जिल्हा आहे, जिल्हयाच्या पश्चिमेस लातूर, हिंगोली व परभणी जिल्हे आहेत, उत्तरेस हिंगोली व यवतमाळ हे जिल्हे आहेत. पुर्वेस तेलंगानातील आदिलाबाद व निजामबाद हे जिल्हे आहेत. दक्षिणेस कनार्टक राज्यातील बिदर जिल्हा आहे.

..2..

या जिल्हयाचे क्षेत्रफळ 105002 चौ.कि.मीटर असून, त्यांचा अक्षवृत्तीय विस्तार 18^0 18’ ते 19^0 15’ उत्तर अक्षवृत असा आहे. तर याचा रेखावृतिय विस्तार 77^0 7’ ते 78^0 15’ पूर्व रेखावृत असा आहे. या भागास प्राचिन कालखंडामध्ये दक्षिणपथ म्हणत असल्याचा शिलालेखीय पुरावा उपलब्ध आहे. नंदीतट विषय वाकाटक साहित्यात आढळतो.

विषय निवड [Selection of Research Topic]

भारतातील पुरातत्व व ऐतिहासिक स्थळांत मराठवाडयाचे स्थान महत्वाचे आहे गोदा खो-यामध्ये अजिंठा व वेरुळची लेणी आहेत. औरंगाबाद जिल्हयात पितळखो-यामध्ये अश्मयुगीन हत्यारे सापडली आहेत. दायमाबाद, अहमदनगर जिल्हयात प्रवरेकाठी सुध्दा ती सापडली आहेत. नेवासा, तेर, भोकरदन, पैठण, नंदीग्राम,इनामगांव, येथेही पुरावशेष मुबलक प्रमाणात सापडतात. प्रतिष्ठाण नगरीचे सातवाहन, मान्यखेटचे राष्ट्रकुट व देवगीरीचे यादव यांचाही मराठवाडयावर प्रभाव होता हे उपलब्ध शिल्पावशेषांवरुन दिसून येते. तसेच उभे असलेली किल्ले मराठवाडयात त्यांच्या राज्याची साक्ष देतात. जितके जास्त किल्ले, राजधान्या, राजवटी, मंदीरे, शिलालेख, मराठवाडयात आहेत तीतकेच युध्द व लढाया सुध्दा मराठवाडयात झालेली आहेत. युध्द व लढाया आल्या म्हणजे वीर गती प्राप्त होणारच आणि त्यांची स्मारके म्हणजे वीर, वीरगळ व त्यांच्या पत्नी, दासी,कौटूंबीक स्त्रीया हया सती जाण्याची प्रथा होती. त्यांचे पुरावे म्हणजेच वीर,वीरगळ, व सतीशीळा होत. त्यांचा अभ्यास होऊन स्थानिक इतिहासाचे महत्व शोधने आवश्यक आहे.

आजपर्यंत मराठवाडयात जी उत्खनने झाली, त्यामध्ये ऐतिहासिक साधनांकडे म्हणावे लक्ष देण्यात आलेले नाही. व सर्वात महत्वाचा ऐतिहासिक पुरावा म्हणजे प्राथमिक साधने म्हणून प्रत्येक राजवटीचे जे पुरावे आढळतात त्यात नाणी, शिलालेख,मंदीरे, किल्ले, मुर्ती, मृदभांडी, प्राचीन बांधकामे, व त्यात प्रत्येक ठिकांणी उपस्थित असणारा महत्वाचा अस्सल व ऐतिहासिक पुरावा म्हणजे वीर, वीरगळ आणि सतीशिळा होत.

महाराष्ट्राची गोदावरी नदी म्हणजे दक्षीण गंगा होय. काशीनंतर हिंदु धर्मात तिचे दुसरे स्थान आहे. तीच्या कुशितच मराठवाडा वसलेला असून गोदेच्या

तिरावरच नांदेड हे पवित्र सांस्कृतीक व धार्मिक नगर वसलेले आहे. सभोवतालच्या परिसरात धार्मिक, सांस्कृतिक, समृध्द अशा विविध राजवटी लाभलेल्या होत्या त्यांचा तत्कालीन शिल्प वैभवांच्या आधारे उपलब्ध ऐतिहासिक साधनाव्दारे जसे वीर- वीरगळ आणि सतीशिळा, काही अभिलेखीत विरगळ व वेगवेगळया प्रकारातील वीरगळाकडे जे आजपर्यंतच्या संशोधनातून विशेष अभ्यास झालेला नाही. त्यामूळे "नांदेड परिसरातील वीर, वीरगळ व सतीशिळा-एक ऐतिहासिक अभ्यास" हा विषय संशोधकाने जाणीवपुर्वक निवडलेला आहे.

आजपर्यंत वीरगळ फक्त तामीळनाडू, कर्नाटक, केरळ, राजस्थान, गुजरात पश्चिम महाराष्ट्रात जास्त आहेत. असा समज होता. परंतू आपल्या भागात गोदाखोऱ्यात त्यापेक्षाही वैशिष्टयेपूर्ण व सरस, मुर्तीशास्त्रीय दृष्टया, धार्मीक, सांस्कृतीक, प्रकारचे वीर वीरगळ आणि सतीशिळा आहेत. याचे संशोधन होणे आवश्यक व अपिरीहार्य आहे असे माझे ठाम मत आहे. काही गावांची नांवे या वीर, वीरगळ आणि सतिशिळा व स्मृती (memories) रहावी म्हणून त्या वीर पुरुष किंवा स्त्रीच्या नावावरुन ओळखली जातात. त्यांचाही शोध घेणे आवश्यक आहे. उदा : सतीगुडा ता.माहुर जिल्हा नांदेड, सतीकुंड, हातणी,सुकळी (विर) सती पांगरा, अशा प्रकारे विविध अंगी अभ्यास करणे संशोधनाव्दारे संशोधकाला शक्य होईल.

संशोधनाची उद्दीष्टे :-

प्रस्तुत संशोधनाची उद्दीष्टये खालील प्रमाणे सांगता येतील.

1) नांदेड जिल्हयाची भौगोलिक व ऐतिहासिक, राजकिय पार्श्वभूमी पुरातत्वीय दृष्ट्या अभ्यासणे.

2) नांदेड जिल्हयातील विर, विरगळ आणि सतिशिळा या ऐतिहासिक साधनांचा पुरातत्वीय व शिल्पशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास करणे.

3) सदरील वीर, वीरगळ आणि सतीशिळा ऐतिहासिक साधनामध्ये अभिलेखीय माध्यमातून अभ्यास करणे.

5) वीर-वीरगळ आणि सतीशिळा यांच्या धार्मिक, सामाजिक व राजकिय आणि ऐतिहासिक, सांस्कृतीक,आर्थिक बाबींचे विश्लेषन करणे.

..4..

संशोधनाची गृहितके : [Hypothesis of research]

वरील संशोधनाच्या प्रकल्पाच्या दृष्टीने काही गृहितकृत्यांची मांडणी खालीलप्रमाणे केलेली आहे

1) सदरील परिसर हा अश्मयुगीन आहे.

2) सामाजिक दृष्टया हा परीसर अन्न उत्पादक, शेती व पशुपालक दृष्टया महत्वाचा आहे.

3) तत्कालीन समाजावर धार्मिक बाबींवर प्रभाव होता हे शिल्पावशेंषावरुन अभ्यासता येते.

राजकिय आर्थिक, सांस्कृतिक, मानववंशशास्त्रीय दृष्टया गोदाखो-यातील नांदेड जिल्हयाचा परिसर वैशिष्टयेपूर्ण आहे. हे अभ्यासता येईल.

संशोधन पध्दती (Research Methodology]

प्रस्तुत संशोधन संशोधनाचा अभ्यास हा क्षेत्रीय संशोधन [field work] व ग्रंथालयीन संशोधन, वस्तुसंग्रहालयातील ऐतिहासिक साधने यांच्या अभ्यास पध्दतीवर आधारीत असल्यामूळे खालील बाबींचा अवलंब केला जाईल.

1) सर्वेक्षण पध्दत

2) संदर्भ पध्दत

3) वस्तुसंग्रहालयातील साधने व प्रकाशने यांचा वापर

4) मुलाखत पध्दत

5) पुर्वी झालेले संशोधनाचा अभ्यास.

नमुना निवड [Sampling]

सदरील संशोधनाकरिता विविध नमुना निवड पध्दतीचा व तंत्राचा वापर केला जाईल. प्रामुख्याने नांदेड परिसरातील काही स्थळांची, निवडक वैशिष्टयपुर्ण महत्वाच्या ठिकाणांची आवश्यकतेनुसार निवड संभाव्य निवड पध्दतीनुसार करण्यात येईल.

संशोधन मर्यादा : [Research limitation]

सदरील संशोधनाचा विषय हा गोदा खोऱ्यातील नांदेड परिसरापुरता मर्यादित राहिल व प्राचीन कालखंडापुरता मर्यादित राहिल. या शोध प्रबंधाचे शिर्षक हे **"नांदेड परिसरातील वीर, वीरगळ व सतीशिळा- एक ऐतिहासिक अभ्यास,"** असे राहिल.

संशोधनाचे महत्व [Importance of Rsearch]

प्रस्तुत संशोधनामध्ये गोदा खोऱ्यातील नांदेड परिसरातील विविध राजवटीतील पुरातत्वीय व ऐतिहासिक साधनांव्दारे अभ्यास करुन वीर, वीरगळ व सतीशिळा या शिल्प वैभवाची मांडणी ही शास्त्रीय व सुसूत्रितपणे करण्यात येईल. विविध राजवटी विषयी काळा विषयी, सांस्कृतिक, सामाजिक, राजकिय, धार्मिक, आर्थिक, ऐतिहासिक, वारशाचे, स्थान महात्म्य यांचे वैशिष्टये स्थानिक इतिहासाचे महत्व लोकांना संशोधनाव्दारे कळेल व स्थानीक इतिहास अभ्यासाव्दारे सिध्द करण्यात येईल.

तथ्य संकलन [Collection of Data]

तथ्य संकलनाचे दोन प्रकार आहेत,

1) **प्राथमिक साधने**

अ) स्थळांचे सर्वेक्षण व संबंधीत साधनाविषयी वस्तुसंग्राहलयांना भेटी देण

ब) सदरील विषयामध्ये महत्वपुर्ण संशोधन केलेल्या तज्ञ व्यक्तींना भेटी देणे व त्यांच्या मुलाखती घेणे व चर्चा करणे.

क) नांदेड जिल्हयाचे गॅझेटिअर

2) **दुय्यम साधने**

अ) संदर्भ साहित्य

ब) संदर्भ ग्रंथ

क) संशोधन पत्रिका

ड) अंतर्जाल [Internet]

ई) प्रकाशित व अप्रकाशित साहित्य

संशोधन प्रबंधाची प्रकरणनिहाय रचना [Chapter scheme of Research]

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील प्रमाणे प्रकरणनिहाय रचना करण्यात येईल.

1) वीर, वीरगळ व सतीशिळा म्हणजे राजकिय व सांस्कृतीक वैभव (वारसा-Heritage] पुर्व इतिहास. विर म्हणजे काय, विरगळ म्हणजे काय त्यांची व्याख्या त्यांचे प्रकार व पुर्व इतिहास याचा सदरील प्रकरणात विर-विरगळांचा उदय व विकास, उगम, विस्तार यावर संशोधनात्मक आढावा घेण्यात येईल.

2) वीर, वीरगळ व सतीशिळा स्थापत्य शैलिची प्रमुख केंद्रे आणि प्राप्ती स्थाने नांदेड परिसरातील स्थापत्य शैलिची प्रमुख स्थाने यांचे सर्वेक्षण करुन सबंधीत स्थळांचे ऐतिहासिक, पुरातत्वीय विश्लेषन करण्यात येईल व वेगळेपणा संशोधनाव्दारे सिध्द करण्याचा प्रयत्न राहिल.

3) वीर, वीरगळ व सतीशिळा यांचे प्रकार, प्रमुख लक्षणे व शिल्पशास्त्रीय दृष्टया अभ्यास. नांदेड परिसरातील विर-विरगळ व सतिशीळा यांचे शिल्पशास्त्रीय दृष्टया व शास्त्रीय अभ्यास करुन सदरील स्थळांचा ऐतिहासिक आढावा घेण्यात येईल.

4) वैशिष्टयपुर्ण व अभिलेखीत वीर, वीरगळ व सतीशिळा यांचा शास्त्रीय अभ्यास आणि विशेषत्वावर, ग्रामनामावर झालेला प्रभाव यांचा विश्लेषनात्मक अभ्यास नांदेड परिसरातील वीरगळ, सतीशिळा यांचा ग्रामनामावर, पुर्वी झालेल्या संशोधनातून अभिलेखीत विरगळ, सतीशिळा यांचा अभ्यास करुन नांदेड परिसरातील विरगळ, सतीशिळा यांचे सर्वेक्षण करुन त्यात काही अभिलेखीत विर, विरगळ, सतीशिळा आढळल्यास त्यांचे संशोधन प्रकल्पात अभ्यासपुर्ण विवेचन राहिल.

5) वीर, वीरगळ व सतीशिळा यांचे तत्कालीन समाज व्यवस्थेत महत्व.

नांदेड परिसरातील वीर,वीरगळ सतीशिळांचे सर्वेक्षणाव्दारे झालेल्या ऐतिहासीक अभ्यासातून सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिकव राजकिय महत्व संशोधनाव्दारे अभ्यासण्यात येईल.

6) उपसंहार

* परिशिष्ट्ये
* संदर्भ छायाचित्रे
* संदर्भ ग्रंथसुची - इंग्रजी व मराठी व webside

मराठी संदर्भग्रंथ

1) महाराष्ट्रातील विरगळ - सदाशिव टेटविलकर, श्रीकृपा प्रकाशन 2014

2) डॉ.सांकलिया : दी गोदावरी पॅलिओलिथिक इंडस्ट्री डेक्कन कॉलेज रिसर्च बुलेटिन - 1952 पुणे.

3) गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती-संपादक प्रभाकर देव, वि.ल. धारुरकर, रा.श्री मोरवंचीकर, प्रकाशक प्रा.दिनकर कोरान्ने औरंगाबाद 2006

4) इतिहास संशोधन स्वरुप व प्रक्रिया - डॉ.प्रभाकर देव, कल्पना प्रकाशन नांदेड 2010

5) लोकराज्य नोंव्हेबर 2011 - चित्र शिल्प विशेषअंक महाराष्ट्र शासन

6) शोधनिबंधाची लेखनपध्दती - स.गं. मालशे, लोक वाङ:मयगृह मुंबई 2011

7) समग्र मराठवाडयाचा संक्षीप्त इतिहास एक अवलोकन - सगर शि.मा. अप्रकाशित पि.एच.डी. प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेङ

8) प्राचिन मराठवाडयातील नगरे व बाजारपेठा यांचा अभ्यास - गंगथडे रमेश अप्रकाशित पि.एच.डी. प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेङ

9) यादवकालीन मराठवाडा एक अभ्यास - कांचन दादाराव कदम अप्रकाशित पि.एच.डी. प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेङ

10) नांदेड जिल्हयाचे ऐतिहासीक महत्व-सुनिलपुरी अप्रकाशित पि.एच.डी. प्रबंध डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

11) मराठेकालीन सती प्रथा व निर्मुलन एक चिकीत्सक अभ्यास - घोडके कैलास नामदेव अप्रकाशित पि.एच.डी. प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेङ

12) सोलापूर जिल्हयातील विरगळांचा सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतीकदृष्टीने एक चिकीत्सक अभ्यास - जांभळे अनिल खताळ अप्रकाशित पि.एच.डी. प्रबंध सोलापूर विद्यापीठ सोलापूर.

13) भारतीय संस्कृती कोश खंड-9, पं.महादेवशास्त्री जोशी

14) मराठी विश्वकोष - विरगळ एक प्रकरण.

15) पुराभिलेख विद्या - सौ.शोभना लक्ष्मण गोखले, कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे 2007

16) पुरातत्व : एक पर्यालोचन - डॉ.माया पाटील, सुविद्या प्रकाशन

17) संशोधन करतांना डॉ.नीलम ताटके - डायमंड पब्लिकेशन 2008

18) भारतातील नदया- प्रा.भास्कर जोहरापुरकर- ख्याती प्रकाशन नागपूर 2016

19) महाराष्ट्राची कुळ कथा - डॉ.म.के. धवळीकर राजहंस प्रकाशन पुणे 2011

20) भारताची मुर्तीकला - पं.महादेवशास्त्री जोशी, प्रकाशक के.वा.जोशी पुणे 1980

21) संस्कृतीचे प्रतीके - प्रकाशक के.वा.जोशी पुणे 1980

22) गोदाकाठच्या तिर्थक्षेत्रांच्या लोककथा - डॉ.शंकर घरजाळे-चिन्मय प्रकाशन 2009

संदर्भग्रंथ - हिंदी

1) भारतीय संस्कृतिके स्त्रोत - भगवत शरण उपाध्याय-पीपुल्स पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली 2006

2) प्राचीन भारत में जनजीवन - एस.आर.भट्ट - पिपुल्स पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली 2011

3) "प्राचीन भारत" के पक्ष में - आर.एस.शर्मा -पिपुल्स पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली 1993

English Reference Books

1] Memorial stones : A Study of their origin, Significance, and variety Issue 11- S. Settar, Gunther-Dietz Sonheimer.[Institute of Indian Arthistory karnataka University 1982]

2] Hero Stones in Tamilnadu - Natanakacinatan-Arun Publication

3] VALUNJKAR. T.N. Social Organmization, Migration and change in a Village Community, 1966 Pp. 85, DCP No.142, D 28.

4] The penguin History of Early India from the Origins to AD 1300 Romila Thatar.

5] SANKALIA, HASMUKH DHIRJLAL. Godavari Palaeolithic Industry, 1952 Pp.59, Figs 43a, DCP No. 28, M 10

6] Society anmd Culture in Deccan from II-Nd century B.C. to 10th Century A.D. unpublished Ph.D. Theses of Ku. Champakalakshmi. [Dr.Baba Saheb Ambadkar University 1974]

7] Man-Animal Relationship in Early Farming Communities of Western India, with special reference to Inamgaon. Unpublished Ph.D. Theses of Mrs. Seema Pavankar 1996 Deccan College Pune.

8] The Vidarbha Megaliths : A Cultural Study Unpublished Ph.D. Theses of Shri. P.S. Joshi. 1993 Deccan College Pune.

9] Megalithic culture : Socio-economic perspectives. Unpublished Ph.D. Theses of U.R. Murti. 1988 Deccan College Pune.

10] Cultural History of Chalukyas of Badami.Unpublished Ph.D. Theses of Smt. Shushubna Kodial Unpublished Ph.D.Theses of U.R. Murti. 1987 Deccan College Pune.

11] Archacology of the Ancicent place names in the Deccan Unpublished Ph.D. Theses of Shri.K.R. Kapre 1961 Deccan College Pune.

12] Middle Palaacolithis Industries of the Deccan Unpublished Ph.D. Theses of K.D.Banarji. 1957 Deccan College Pune.

13] International Encyclopedia of the social sciences, Vol.V. [Historeigoraphy] 1972.

संशोधक

काळे दिपक सोनाजीराव

(एम.ए.एम.फील पि.जी.डिप्लोमा इन म्युजिऑलॉजी)

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ.सुर्यवंशी नारायण बाबुराव

(एम.ए.एम.फील पी.एच.डी.) इतिहास विभाग प्रमुख

शिवनेरी महाविद्यालय शिरुर अनंतपाळ जि.लातूर